Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# जालना जिल्हयाची सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक स्थिती

**प्रा. निहाळ रामदास बाबाजी**
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालय,
बदनापुर ता. बदनापुर जि. जालना.

**प्रस्तावना:-**

जालना जिल्हा हा स्वतंत्र भारतातील महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी आहे. तसेच मराठवाडयाच्या उत्तर दिशेस स्थीर आहे. जालना जिल्ह्याच्या निर्मितीच्या प्रक्रियेकडे लक्ष वेधले असता आपणास असे दिसून येते की, जालना जिल्हा निजामाच्या काळात देखील अस्तित्वात होता. निजामाने जालना जिल्ह्याची एकूण भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊनच हा जिल्हा निर्माण केला होता. परंतु हा जिल्हा फार तर एक वर्षच अस्तित्वात होता. कारण हैद्राबाद आंदोलनाने उचल घेतली आणि हा जिल्हा संपुष्टात आला. प्रशासनाच्या सोयीसाठी निजाम सरकारने औरंगाबाद जिल्ह्याचे विभाजन करून जालना जिल्ह्याची निर्मिती १९४८ मध्ये केली होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जवळपास वीस वर्षानंतर पुन्हा जालना जिल्हानिर्मितीच्या प्रक्रियेने जोर धरला. जालना जिल्हा निर्माण होण्यापूर्वी हा एक औरंगाबाद जिल्हातील प्रगत असा तालुका होता.

जालना ही एक पूर्वपार चालत आलेली मोठी बाजारपेठ होती. जालना नगरपालिकेचे स्रोत मोठे होते. १९६० ते १९८२पर्यंत औरंगाबादला जालना नगरपालिकेने मोठी आर्थिक रसद देखील पुरवलेली आपणास दिसून येते. परंतू या प्रगत अशा तालुक्याचे जिल्ह्यात रूपांतर होण्यासाठी येथील माजी खासदारांच्या नेतृत्वाने व व्यापारी वर्गाने पुढाकार घेतला. यामध्ये स्व. बाळासाहेब पवार, माजी मंत्री स्व. भगवंतराव गाढे, माजी आमदार राधाकिसन लाला, माजी आमदार मोहनलालजी गोलेच्छा, माजी मंत्री बाबूसेठ दायमा, माजी आमदार शकुंतलादेवी शर्मा, माजी मंत्री माणिकदादा पालोदकर यांनी वेळोवेळी नेतृत्व करून मार्गदर्शन केले. केवळ राजकीय दृष्टीकोनावर अवलंबून न राहता समाजाच्या सर्व स्थरातून पाठिंबा मिळविण्यासाठी जालना जिल्हा निर्माण होण्यासाठी अनेक सामाजिक चळवळी उभारण्यात आल्या होत्या.

यासाठी एक कृति समिती देखील स्थापन करण्यात आली होती. या कार्यकारी समितीमध्ये अनेक नागरीक व सामाजिक कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये स्व. रूस्तुमजी जालनावाला, स्व. वसंतराव देशपांडे, स्व. मनोहरराव जळगांवकर, लक्ष्मण श्रीपत उत्तमचंद सेठीया, रामचंद्रजी आर्य, बाजीराव पाटील, वसंतराव चव्हाण, पुरूषोत्तमसेठ बागडीया, ॲड याकूब आणि माणिकचंदजी बोथरा, शशिकांत पटवारी, प्रा. भगवान काळे, जी. टी. रत्नपारखे इ. अनेक कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले होते. जालना वर्कींग कमिटीने याच कार्याचा एक भाग म्हणून १४ जानेवारी १९८१ ला जालन्यात सिंधीबाजारात मा.मुख्यमंत्री बॅ.अंतुले यांचा जाहीर सत्कार घडुन आणण्याचे ठरविले होते. यावेळी याकमिटीने मागणी जोरदारपणे मांडून जालना जिल्हा निर्माण करणे कसे आवश्यक आहे हे सरकारला पटवून दिले. तेव्हा मा.मुख्यमंत्री साहेबांनी जालना जिल्हानिर्मितीची घोषणा केली. अवघ्या काही महिन्यातच १ मे १९८१ रोजी जालना जिल्ह्याची निर्मिती घडून आली. यासाठी औरंगाबाद जिल्ह्यातील काही भाग तर परभणी जिल्ह्यातील काही भाग जोडण्यांत आला. जालना, भोकरदन, अंबड आणि परतूर हे चार तालुके मिळून हा जिल्हा बनविण्यांत आला.

आज जालना जिल्ह्यामध्ये जालना, अंबड, भोकरदन, जाफराबाद, परतूर, मंठा, बदनापूर, घनसावंगी असे एकूण आठ तालुके आहेत तर जालना, बदनापूर (अ.जाती), घनसावंगी, भोकरदन व परतुर असे एकूण ५ पुनर्रचित विधानसभा मतदारसंघ आहेत. प्रशासकिय रचनेच्या दृष्टीने जिल्हयात जालना, परतूर, भोकरदन व अंबड यासाठी उपविभागीय अधिकारी नेमण्यात आलेले आहे. लोकसभेसाठी जालना एकच लोकसभा मतदारसंघ आहे. २०११ च्या जनगननेनुसार

जालना जिल्हयात एकूण ९७१ गावे असून त्यापैकी ९६३ गावे वस्ती असलेली व ८ ओसाड गावे आहेत. जिल्हयात ८०६ स्वतंत्र ग्रामपंचायती व १५७ गट ग्रामपंचायती आहेत. तर पंचायत समितीची संख्या ०८ आहे. जालना ही जिल्हापरिषद असून तिची सदस्य संख्या ५५ आहे. जालना येथे 'अ' दर्जाची नगरपालिका असून परतूर, भोकरदन व अंबड येथे 'क' दर्जाची नगरपालिका अस्तित्वात आहेत. तसेच बदनापूर, घनसांवगी, मंठा आणि जाफ्राबाद येथे २०१५-१६ मध्ये नगरपंचायत निर्माण करण्यात आल्या आहेत. याचबरोबर २०२१-२०२२ मध्ये मंठा, तिर्थपुरी, येथे नगरपंचायत निर्माण करण्यात आल्या आहेत.

**जालना जिल्हयाची भौगोलिक स्थिती:-**

भौगोलिकदृष्ट्या जालना जिल्हा हा महाराष्ट्राच्या मध्यभागी असलेला जिल्हा आहे. या जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७,७१८ चौ.कि.मी. आहे. येथील पर्जन्यमान ५५ से.मी. आहे. तुलनात्मक दृष्ट्या अंबड, घनसावंगी, परतूर येथे जास्त पाऊस पडतो. जिल्ह्यात पावसाची सरासरी सर्वसाधारणपणे ७०३ मिली.मी. आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस बुलढाणा, पुर्वेस परभणी, हिंगोली तसेच बुलढाणा जिल्ह्याचा भाग येतो. दक्षिणेस बीड तर पश्चिमेस औरंगाबाद जिल्हा आहे. जिल्ह्याच्या वायव्य भागात डोंगरटेकड्याचा प्रदेश येतो. हे डोंगर अजिंठ्याचे डोंगर आणि जालन्याचे डोंगर म्हणून ओळखले जातात. जिल्ह्याचा बहुतेक भाग हा मैदानी आहे. गोदावरी नदीही जिल्ह्यातून वाहणारी मुख्य नदी आहे. ती जिल्ह्याच्या दक्षिण सीमेवरून पश्चिमेकडे पूर्वेस वाहते. 'गल्हाटी' ही गोदावरीची उपनदी आहे. जिल्ह्याच्या उत्तर भागातून पूर्णा नदी वाहते. खेळणा, धामणा, गिरजा आणि जीवरेखा या पूर्णेच्या उपनद्या म्हणून ओळखल्या जातात. याशिवाय कुंडलिका, दूधना, कल्याण या नद्या देखील जालना जिल्ह्यात महत्वाच्या नद्या म्हणून ओळखल्या जातात. एकूण महाराष्ट्राच्या २.५ क्षेत्रफळ हा जिल्हा व्यापतो. जिल्ह्याचे जालना व परतूर असे दोन प्रशासकीय उपविभाग आहेत. जिल्ह्याचे हवामान उष्ण व कोरडे आहे. येथे उन्हाळयात ४१° से. इतके तापमान असते. जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी असून सरासरी ७०० सेमी. इतका पाऊस होतो.

**जालना जिल्हयाची ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटनस्थळे:-**

जालना जिल्ह्याला खूप मोठी ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक, औद्योगिक परंपरा आहे. जिल्ह्यातील ऐतिहासिक परंपरेच्या पाऊल खुणा आहेत. सर्व धर्माची श्रद्धास्थाने या जिल्ह्यात दिसून येतात. या जिल्ह्याचा इतिहास म्हणजे मराठवाडा मुक्ती संग्रामाशी जोडलेला आहे. जालना शहराविषयीचे संदर्भ एन.ए.अकबरीमध्ये देखील सापडतात.

जालना जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळ म्हणून आला पूर आसाई हे ठिकाण प्रसिद्ध आहेत. आसाई येथे मराठ्यांनी खेळणा नदीच्या तिरावर २८सप्टेबर१८०३रोजी इंग्रजांशी कडवी झुंज दिली होती. या लढाईत इंग्रजांचे ११उच्च पदस्थ लष्करी अधिकारी आणि विविध पदावरील ११३अधिकारी ठार झाले. त्याचे स्मृती स्मारक येथे उभारण्यात आले आहे. या लढाईची साक्ष म्हणून येथे एक इमारत ही आहे. पण ही इमारत आज मोडकळीस आली आहे. तरी देखील या इमारतीने लढाईच्या आठवणी जिवंत ठेवल्या आहेत. या लढाईत मराठ्यांनी शर्थीची लढत दिली पण यात ते पराभूत झाले. यानंतर मात्र मराठी सैन्यांनी इंग्रजी साम्राज्याला १८०३ ते १८५७ पर्यंत जबरदस्त हादरे दिले. १८५७ मध्ये पानीपत वर मराठ्यांनी अखेरची झुंज दिली. या लढाईच्यावेळी जालना जिल्ह्यातील परतूर यागावातून मरेल किंवा मारीन ही शपथ घेऊन ८०हजार फौज पानिपतकडे रवाना झाली होती. जालना जिल्ह्यातील प्रत्येक गावातील माणूस या फौजेमध्ये सामील झाला होता. यामुळे या दोन्ही लढाया जालना जिल्ह्याच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत.

जालना ही पूर्व पार चालत आलेली बाजारपेठ होती. जालना या शहराला अकबर, औरंगजेब यांनी भेटी दिलेल्या नोंदी देखील उपलब्ध आहेत. १६७९ साली मोगलांच्या ताब्यात असलेल्या जालना शहरावर छत्रपती शिवाजी महाराजांनी आक्रमण करून लुटल्याचे पुरावे देखील उपलब्ध आहेत. एवढेच नव्हे तर शिवाजी महाराजांचे नातू छत्रपती शाहू महाराज यांचे वास्तव्य देखील जालना जिल्ह्यातील पारध याठिकाणी काही दिवस वास्तव्य होते. त्यांच्यावर विष पाजण्याचा प्रयोग देखील येथेच करण्यात आला होता.

सातवहन काळात जालना जिल्ह्यातील भोकरदन हे एक मोठे व्यापारी केंद्र होते. उत्खननामध्ये आजही तेथे सातवाहन काळातील अनेक वस्तू, नाणी भांडी सापडलेली दिसून येतात. निजामाच्या काळात जालना हे एक हैद्राबाद

राज्याचे लष्करी व प्रशासकीय दृष्टीकोनातून महत्वाचे केंद्र होते. याठिकाणी अनेक महत्वाच्या गावांमध्ये लष्करी व पोलीस ठाणी होती. जालना जिल्ह्याचा भाग हैदराबाद स्टेट आणि इंग्रजी साम्राज्य यांमधील सीमावर्ती भाग होता. याच कारणामुळे जालना जिल्ह्याला निजामाच्या काळात महत्वाचे स्थान होते. हैदराबाद मूक्ती संग्रामामध्ये देखील जालन्याने महत्वाची भूमिका बजावलेली दिसून येते. हैदराबाद मूक्ती चळवळच येथून सुरू झालेली आपणांस दिसून येते. या आंदोलनामध्ये जिल्ह्यातील जवळपास सर्वच गावांनी सहभाग घेतला होता. म्हणूनच या जिल्ह्याचा इतिहास म्हणजे मराठवाडा स्वातंत्र्य संग्रमाचा इतिहास म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील अनेक गावांनी सत्याग्रहामध्ये हिरीरीने भाग घेतला होता. तर बऱ्याच ठिकाणी आंदोलनाची केंद्रे उभारली होती. येथील जनता केवळ मराठवाडा मुक्ती संग्रामातच सहभागी झाली नव्हती तर संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीत देखील सहभागी झाली होती.

**जालना जिल्हयातील साहित्य व सांस्कृतीक कार्य:-**

जालना जिल्हा केवळ ऐतिहासिक धार्मिक श्रद्धास्थाने या दृष्टीने महत्वपूर्ण नसून या जिल्ह्यात अनेक सांस्कृतिक चळवळी देखील उदयास आल्या. जालना जिल्ह्याच्या या पावनभूमीत अनेक संत-महंत देखील होऊन गेले आहेत. अनेक किर्तनकार, प्रवचनकार महाराज देखील कार्यरत आहेत. संत रामदास स्वामी सारखे संत या जिल्ह्यात जन्माला आले आहेत. त्यांनी दासबोध सारखा ग्रंथ लिहिला. त्यांच्या लिखाणापैकी 'मनाचेश्लोक आज प्रसिद्ध आहेत. रामदास स्वामी यांचे जेष्ठ गुरू बंधू गंगाधर पंत उर्फ रामी रामदास यांनी भक्ती रहस्य आणि सुंगमोपाय हे ग्रंथ लिहिले आहे. रामदास स्वामी यांनी रामभक्तीचा प्रसार व्हावा म्हणून देशभरात ११०० मठ व हनुमान मंदिरे बांधली आहेत. आनंदस्वामी, नळणीये, काळूबाबा, न्हावा येथील रंगनाथ महाराज इ. अनेक संत होऊन गेले. उमरखेडा येथील प.पू.पुरूषोत्तम महाराज, उटवद येथील चैतन्य पूरी महाराज, संतश्रेष्ठ लक्ष्मण महाराज, यशवंत महाराज जालनेकर, आनंदगडावरील भगवान महाराज यांनी किर्तनांची परंपरा पूढे चालविली.

अलिकडील काळातील मराठवाड्यातील सर्वात मोठा प्रतिभा संपन्न लेखक म्हणून ज्याचा गौरव केला जातो ते बीरघूनाथ (भगवान रघुनाथ कुलकर्णी) हे परतूर तालुक्यातील सातोन्याचे. त्यांनी पुन्हा नभाच्या लालकडा, मिटलेले आकाश, आलाप आणि विलाप, हिरवे गुलाब,फकिराची कांबळी ही त्यांची गाजलेली पुस्तके होय. रेखा बैजल या जालन्याच्या कवयित्रीने देखील आपली महाराष्ट्रभर ओळख म्हणून प्रसिद्धी मिळविली आहे. किशोर घोरपडे, प्रा.दासुवैद्य, प्रा.बी.वाय.कुलकर्णी, प्रा.रावसाहेब ढवळे, प्रा.जयराम खेडेकर यांचे साहित्यिक क्षेत्रातील कार्य देखील महत्वपूर्ण आहे. प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर, प्रा.रूस्तुम अचलखांब हे देखील जालन्यातील साहित्यिक होय.

**जालना जिल्हयाची सामाजिक व शैक्षणिक स्थिती:-**

जशी सांस्कृतिक क्षेत्रात जिल्ह्यात अनेक परंपरा निर्माण झाल्या त्याचप्रकारे सामाजिक क्षेत्रात अनेक समाज सेवेला वाहून घेतलेले कार्यकर्ते तयार झाले आहेत. यामध्ये कुंदनलालाजी अग्रवाल, मदनलाल चौवरिशिया, ॲड रामचंद्रजी याडकीकर, दत्ताजी भाले, नेत्ररोग तज्ञ डॉ. दि. अ. अंबेकर, डॉ.शंकरलालाजी अग्रवाल, बाबूराव व्यवहारे, विश्वनाथ खेरूडकर, एन.एस.रत्नपारखी, दलित मित्र सतकर मामा, कृषीभूषण विजय अण्णा बोराडे, प्रा. बी. वाय. कुलकर्णी इ. अनेक जेष्ठ नागरीकांनी जालन्यात समाजसेवेचे ऋण घेतलेले दिसते. जालना जिल्ह्यामध्ये मराठवाडा मुक्तीसंग्रामामध्ये अनेक नागरिकांनी हिरीरीने भाग घेतला होता. यामध्ये स्वातंत्र्य सैनिक, अच्यूत भाई देशपांडे (भाटेपूरी), स्वातंत्र्य सैनिक मनोहर सोनदे (वैजापूर) हे पूर्णवेळ संघटक म्हणून कार्य केलेले होते. याचबरोबर हुतात्मा जनार्धन मामा नागपूरकर, विजयेंद्र काबरा (जालना), मूरलीधर काळे, रघूनाथ रांजणीकर, संपत नाईक भिल्ल (कोलते टाकळी) हैद्राबादच्या स्वातंत्र्य लढ्यात धारातिर्थ पडलेल्या स्वातंत्र्य सैनिकांचे जालना (मानेगांव),भोकरदन येथे (पिंपळगांवकोलते),जाफराबाद (वरूड)येथे स्वातंत्र्यसैनिकांची स्मारके देखील आहेत.

आपण जालना जिल्ह्याची सामाजिक माहिती बघत असतांना आपल्या लक्षात येते की, जालना जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १९,५८,४८३ असून त्यापैकी पुरुषांची संख्या १०,१५,११६ व स्त्रीयांची संख्या ९,४३,३६७ एवढी आहे. स्त्री-पुरूष प्रमाण १०००पुरूषांमागे स्त्रीयांचे प्रमाण ९२९ आहे. जिल्ह्यातील ८०% पेक्षा जास्त लोकसंख्याही

ग्रामीण भागात राहते. तर २० टक्यांहून कमी लोकसंख्या शहरात वास्तव्यास आहे. यावरून आपल्या असे लक्षात येते की, जालना जिल्ह्यात शहरीकरणांचा वेग अत्यंत कमी आहे. जालना जिल्ह्यामध्ये अनूसूचित जातीचे प्रमाण ११.२२ टक्के आहे. अनुसूचित जमातीचे प्रमाण २ टक्के आहे. याशिवाय जिल्ह्यात मुस्लीमांचे प्रमाण १२ टक्के आहे. पाण्याच्या सुविधेसह मालकीचे घर असलेल्यांच प्रमाण खेड्यांमध्ये १.६० टक्के इतके असून शहरात यांचे प्रमाण ३४.७० टक्के इतके आहे.

मानवी विकास निर्देशांकानुसार जालना जिल्ह्यांत २००२ साली मानवी विकास निर्देशांक हा ३३व्या क्रमांकावर आहे. लोकसंख्येची घनता ही प्रति चौरस कि.मी. २५५ आहे. साक्षरतेच्या बाबतीत देखील जिल्ह्याची फार समाधानकारक वाटचाल दिसून येत नाही. २००१च्या जनगणनेनुसार जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण ६४.५२ टक्के होते. त्यापैकी पुरूष साक्षरतेचे प्रमाण ७९.१९ टक्के तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ४९.१९ टक्के असे होते. त्यात २०११च्या जनगणनेत वाढ झाली असून जिल्हयातील एकूण साक्षरतेचे प्रमाण ७३.६१ टक्के आहे. त्यापैकी पुरुष साक्षरतेचे प्रमाण ८२.२५ टक्के व स्त्री साक्षरतेचे प्रमाण ६१.२८ एवढे असल्याचे दिसून येते.

इ.स.१९६०मध्ये जिल्ह्यात अनेक शैक्षणिक संस्था, विद्यालये सुरू करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा गावोगांव पोहचल्या. त्यामुळे जिल्ह्यामध्ये शिक्षणाच्याबाबतीत संख्यात्मक वाढ झाली. परंतु गुणात्मक वाढ पाहीजे त्या प्रमाणात झाली नाही. बोटावर मोजण्या एवढ्या शिक्षण संस्था सोडल्या तर बहुतांशी शाळांना क्रिडांगणे नाहीत. प्रयोगशाळा, ग्रंथालये नाहीत. जिल्ह्यामध्ये ९५टक्के शाळा ह्या जिल्हा परिषदेच्या आहेत. जालना शहरांमध्ये आणि तालुका पातळीवर अनेक महाविद्यालये, कॉलेजेस निर्माण झाली. काही ठिकाणी ग्रामीण भागात गावपातळीवर देखील अनेक महाविद्यालये निर्माण झाली आहेत. जिल्ह्यांमध्ये या विद्यालयाबरोबरच कृषी महाविद्यालये, अभियांत्रिकी व तंत्रशिक्षण महाविद्यालये व मेडीकल कॉलेज देखील स्थापन झालेले आहेत. असा शिक्षणाचा विस्तार असला तरी हा जिल्हा शिक्षणांच्या दृष्टीने मागासलेलाच दिसून येतो. शैक्षणिक विकासाच्या दृष्टीकोनातून विचार केला तर शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि संस्थाचालक या चारही घटकांचा परस्परांवर विश्वास निर्माण होणे गरजेचे आहे. गुणवंत विद्यार्थी हेच शिक्षण संस्थेचे खरे वैभव असते. सर्वच विकासाच्या वाटा या शिक्षणांच्या माध्यमातून जात असल्यामुळे शिक्षणाच्या क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडणे आवश्यक झाले आहे. जालना जिल्हयामध्ये २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात एकूण प्राथमिक शाळांची संख्या २०९८ एवढी असून त्या शाळेत विद्यार्थ्यांची एकूण पटनोंदणी ३,२६,२९० व प्राथमिक शिक्षकांची संख्या ११,७६८एवढी होती.

जालना जिल्हयातील डॉ.फ्रेजर बॉईज हायस्कूल (१८१८), सी.टी.एम.के.गुजराथी विद्यालय (१९२७), राष्ट्रीय हिंदी विद्यालय (१९५२), सरस्वती भुवन प्रशाला (१९५५), श्रीमती दानकुंवर हिंदी कन्या विद्यालय (१९५८), डग्लस गर्ल्स हायस्कूल (१९९६) , मत्स्योदरी शिक्षणसंस्था (१९७५), जे.ई.एस.महाविद्यालय (१९७५), बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय (१९९३), रामचंद्र सांस्कृतिक क्रीडा मंडळ (१९९४), राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय परतूर, सिध्दार्थ महाविद्यालय जाफराबाद , कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बदनापूर ही नावाजलेली शाळा व महाविद्यालये आहेत.

**संदर्भ**

१) प्रा.काळे भगवान,आपला जालना जिल्हा. पृ. क्र. १५
२) www.Jalna.nic.in
३) भालेराव अनंत. हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा (जानेवारी २००१). मुंबई : मौज प्रकाशन
४) संपादक, दै.लोकमत,जालना वर्धापन दिन विशेष.९जानेवारी२००९.पृ.क्र.१
५) गऊळकर शिवाजी. जालहनापूरचा हकीकतनामा (नोव्हें १९६१). औरंगाबाद : मराठवाडा साहित्य परिषद.पृ.क्र.५ते२३.
६) औरंगाबाद डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर इ.स.१९७७